**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.युवराज शामराव जाधव
मु.पो.उरुण इसलामपूर(उदय चौक), ता.वाळवा, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९ / अपील / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.युवराव शामराव जाधव
मु.पो.उरुण इसलामपूर(उदय चौक), ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली
श्री.शंकरराव महादेव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली
श्री.प्रकाश जनार्दन जेधे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** | |

आपले पत्र दि.१८५९, दि.१४.३.२००६ पत्रातील मुद्दा क्र.१ नुसार जी माहिती कळविली आहे श्री.एस.एस.सदामते, उप कार्यकारी अभियंता व श्री.आर.एम.माळी, कनिष्ठ अभियंता, इसलामपूर यांना लेखी खुलासा मागितला होता त्यानुसार दोषी असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी नियमांचा भंग करुन शेतीपंपाला वीज कनेक्शन दिले याबाबत आरोपपत्र देण्यात आले किंवा कसे, त्यांच्यावर कारवाई करावी.

## विवेचन

आपल्या शेतजमिनीमध्ये व्यक्तीला वीजजोड दिल्याच्या प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.युवराज शामराव जाधव यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, सांगली यांच्याकडे दाद मागितली होती. परंतु त्यांनी केलेल्या कार्यवाहीने समाधान न झाल्यामुळे श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१४.५.२००८ रोजी सांगली येथे झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. परंतु तीनही घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१२.११.२००८ रोजी घेण्यात आली.

वीज जोडणीच्या संदर्भातील हा विषय श्री.जाधव गेल्या काही वर्षांपासून सातत्याने मांडत आहेत. त्यातील एका अपिलासंदर्भात (अपील क्र.२९ मध्ये) आयोगाने यापूर्वी निर्णयही दि.८.२.२००८ रोजी दिलेला आहे.

श्री.जाधव यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबतची माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आलेली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवरील कारवाईचा विषय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्याबाबत चालू आहे. विविध ठिकाणच्या दोन कार्यालयांशी संबंधित

माहिती असल्यामुळे प्रारंभीची माहिती देण्यास विलंब झाला व त्याबद्दल अपीलकर्त्यास कळवून लेखी दिलगिरीही व्यक्त केली होती. संबंधित कालावधीमध्ये सांगली जिल्ह्यात असलेल्या महापूराच्या परिस्थितीमुळे हा विलंब झाल्याचे अपीलकर्त्यास स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२३.११.२००७ च्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले होते. आयोगापुढील सुनावणीत त्यांनी त्याची विस्ताराने कल्पना दिली. भाऊबंदांमधील कौटुंबिक वादातून हा विषय श्री.जाधव सातत्याने वेगवेगळ्या खात्यांकडे मांडत आहेत. संबंधित कागदपत्रे महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना वेळोवेळी उपलब्ध करुन दिली आहेत. त्याबद्दल आपली काही तक्रार नसल्याचेही त्यांनी लेखी नमूद केले आहे, असेही जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश जनार्दन जेधे व अपिलीय प्राधिकारी श्री.शंकरराव महादेव पाटील यांनी नमूद केले.

आपण शेतकरी असून वीज जोडणीच्या संदर्भात आपल्यावर अन्याय झाल्यामुळे आपले मोठे नुकसान होत आहे व त्याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी श्री.जाधव यांनी विविध अर्जांद्वारे व सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये केली आहे. ही कारवाई तत्परतेने व योग्य प्रकारे केली जात नसल्याची त्यांची तक्रार आहे. मात्र हा विषय प्रशासकीय कारवाईचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही. त्यामुळे आयोगाला त्याची दखल घेता येणार नाही.

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.निवृत्ती परसू कणसे
विक्रीकर कार्यालय , कुबेरा चेंबर्स
(मारुती शोरुमच्या वरच्या मजल्यावरती)
वखार भाग, सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अप्पर विक्रीकर आयुक्त, पुणे क्षेत्र पुणे यांचे कार्यालय,
विक्रीकर भवन , चौथा मजला, पुणे ६ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक
अपर विक्रिकर आयुक्त, पुणे क्षेत्र यांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, चौथा मजला , पुणे ६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११ / सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३/८/२००६ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५/८/२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/९/२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५/१०/२००६ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | अपीलकर्त्याने त्यांच्याबाबत अप्पर विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना पत्र क्र ब ५१ दि. १५/३/२००५ मधील परिच्छेद संदर्भ क्र.१ मध्ये पाठविलेला अहवाल मिळणेबाबत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.निवृत्ती परसु कणसे यांनी अप्पर विक्रीकर आयुक्त ,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पत्र क्र ब ५१ दि. १५/३/२००५ मधील परिच्छेद संदर्भ क्र १ मध्ये पाठविलेल्या अहवालाच्या प्रती मागितल्या होत्या.

अपीलकर्ता श्री कणसे यांचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केले होते. प्रस्तुत अपिलाचा समावेश दि. १४/५/२००८ रोजीच्या पुणे येथील " विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत " समावेश करण्यात आला होता. पत्रातील तपशील गोपनीय स्वरुपाचा व या व्यक्तीशी संबंधित असा आहे, त्यात लोकहिताचा विषय नाही, तसेच प्रकरण न्यायालयात आहे, असे जन माहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक अपर विक्रिकर आयुक्त, पुणे क्षेत्र व अपिलीय प्राधिकारी अप्पर विक्रिकर आयुक्त पुणे क्षेत्र यांनी माहिती नाकारण्याचे कारण प्रपत्रात नमूद केले आहे. ते योग्य नाही. प्रस्तुत अपीलातील कागदपत्रे पाहता. मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मध्ये नमूद केलेल्य अपवादांमधील नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास आठ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. याबाबतचा अनुपालन अहवाल दि. २५.११.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** १५.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक दिनकर गोखले
७९९८/२, शिवरंजनी, स्टेशन रोड, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२,
मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८ / सांगली /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक दिनकर गोखले
७९९८/२, शिवरंजनी, स्टेशन रोड, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, सांगली प्र.श्री.व्ही.डी.धनशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२,
मिरज, जि.सांगली श्रीमती वि.अ.वेदपाठक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.९.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सांगली,मिरज व कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील रागेश्री अपार्टमेंट स्किम मधील श्री.रियाझ शेख व श्री.अब्बास हसन तांबोळी यांनी खरेदी रजिस्टर करतानाची भोगवटा प्रमाणपत्राबद्दल दिलेली माहिती. भूखंड व त्यावरील बांधिव इमारत याचा खरेदीदस्त नोंद करताना भोगवटा प्रमाणपत्र आवश्यक आहे का? तसे पूर्वी घेतलेले आहे का? |
|---|---|

## विवेचन

भूखंड व त्यावरील इमारत यांच्या खरेदीदस्त नोंदणीच्या वेळी भोगवटा प्रमाणपत्र आवश्यक असते की नाही, या संदर्भात अपीलकर्ता श्री.विनायक दिनकर गोखले यांनी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, मिरज, जि.सांगली यांनी दिलेली माहिती अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ग्राह्य ठरवली, त्याविरुध्द श्री.गोखले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता हे गैरहजर असल्याने या अपिलाची सुनावणी दि.१२.११.२००८ रोजी घेण्यात आली.

श्री.गोखले यांना परिपत्रकाची प्रत आधी देण्यात आली नव्हती. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्याचा तपशीलही देण्यात आला नव्हता. तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांकडेच तत्कालीन सहनिबंधक वर्ग-२ या पदाचा कार्यभार होता. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास त्यांनी अपील आणून दिल्याचे दिसत नाही व स्वतःच्या अधिकारात अपिलाचा निर्णय दिल्याचा दिसते, असे अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.८.५.२००८ च्या निवेदनात नमूद केले आहे. दरम्यानच्या काळात आवश्यक परिपत्रकासह सर्व माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी श्रीमती वि.अ.वेदपाठक व अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.डी.धनशेट्टी यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. अपीलकर्त्याशी आपण दूरध्वनीवर संपर्क साधला असता माहिती मिळाली असल्याचे त्यांनी

सांगितल्याचेही प्रतिपादन श्री.धनशेट्टी यांनी केले. त्याची पोहोच आठ दिवसात त्यांनी सादर करावयाची आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५.१२.२००७

डिसेंबर-२००८मौ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंद रामचंद्र दिपाळे
विश्रामबाग, शिवदर्शन कॉलनी
ता.मिरज, जिल्ह सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
कृषि अधिकारी सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
कृषि अधिकारी , सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/८/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/१/२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६/२/२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५/४/२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३/५/२००७ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १/७/९८ ते दि. ३१/१२/२००६ या कालावधीतील आकृतिबध्द कार्यक्रम व एकूण कार्यालयीन कामकाजाबाबत मुद्दयांची माहिती मागितली होती |

# विवेचन

अपीलकर्ता श्री. आनंद रामचंद्र दिपाळे यांनी दि. १/७/९८ ते दि. ३१/१२/२००६ या कालावधीतील आकृतिबध्द कार्यक्रम व एकूण ६ कार्यालयीन कामकाजासंबंधित माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांच्याडून झालेल्या प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने आयोगाकडे अपील केले . दरम्यानच्या काळात मूळ अपीलावर चर्चा होऊन आपले पूर्ण समाधान झाल्याने आपली काहीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे सदर अपिल निकाली काढावे अशी विनंती आपीलकर्त्याने दि. ३०/८/२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास केली आहे.

# आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ,पुणे**

**पुणे**
**दि. ३१.१०.२००८**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३२९ / कोल्हापूर | श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले ६०८/ई, शाहूपुरी, पहिली गल्ली, कोल्हापूर | निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर | श्री. प्रकाश पाटील यांचा लेखी जबाब, आयुक्त पुणे यांच्याकडील दिनांक २२-११-०६ चे पत्र, हुकूमनाम्यात दुरुस्ती करता येत नसल्याबाबत आयुक्त कार्यालयाचे पत्र. | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अर्जदाराच्या दि.२५-१०-०४ च्या अर्जावर फेरसुनावणी करून निर्णय घेण्याचे ठरले. |
| २ | ३७० / कोल्हापूर | श्री. अशोक रामचंद्र रणदिवे मु.पो. नेसरी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | ग्रामपंचायत, नेसरी कडील सुधारीत पाणी पुरवठ्याबाबत माहिती | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. तसे अपीलकर्त्याने लेखी कळविले. |
| ३ | ३७१ / कोल्हापूर | श्री. अशोक रामचंद्र रणदिवे मु.पो. नेसरी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | गटविकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | मयत श्री. कृष्णा बाबूराव सूर्यवंशी रा.नेसरी यांच्या आर.सी.सी. बांधकामाबाबत. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले. तसे अपीलकर्त्याने लेखी कळविले. |
| ४ | ३७६ / कोल्हापूर | श्री. कृष्णाकांत गोपाळराव गायकवाड रा. टोप, ता.हातकणंगले. जि.कोल्हापूर | अपर पोलीस उपआयुक्त / अपर पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो, पुणे | पोलीस उप आयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे | लोकसेवक श्री. पाटील यांच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणातील माहिती. | माहितीबाबत अपीलकर्त्याचे समाधान झाले, असे प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४२३ / कोल्हापूर | श्री. बापूसाहेब शांतीनाथ मिठारी २२१/ब, वॉर्ड ई, राजहंस अपार्टमेंट, फ्लॅट नं जी-५, जनरल थोरात मार्ग, ताराबाई पार्क, कोल्हापूर | करनिर्धारण व आकारणी अधिकारी,सी-वॉर्ड, कोल्हापूर म.न.पा., घरुफाळा विभाग, शिवाजी मार्केट, कोल्हापूर | करनिर्धारण व आकारणी अधिकारी, सी-वॉर्ड, कोल्हापूर म.न.पा., घरुफाळा विभाग, शिवाजी मार्केट, कोल्हापूर | घर नं. ६५१, ६५२ सी वॉर्ड, आझाद चौक, कोल्हापूर या मिळकतीच्या आकारणीबाबत माहिती. | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने लेखी कळविले. |
| ६ | ४४३ / कोल्हापूर | श्री. बळवंत दशरथ रोकडे रा.६७३, ई वॉर्ड, भोसले वाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर | नगर रचना विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | अपीलकर्त्याच्या जागेतील बांधकामाबाबत दि. १८-०५-२००५ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती. | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपीलकर्त्यास ७ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे ठरले. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले (क्र.३२९, ३७०, ३७१, ३७६, ४२३ व ४४३ / कोल्हापूर ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक ३२९ व ४४३ / कोल्हापूर मध्ये नमूद केल्यानुसार संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पूर्तता करुन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४-११-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. मदनराव भगवानराव घार्गे, वडगाव जयराम स्वामी, ता.खटाव, जि.सातारा. यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४० / सातारा | तालूका निरीक्षक, भूमि अभिलेख, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा | जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, खटाव (वडूज), ता.खटाव, जि.सातारा | मौजे वडगाव(ज.स्वा.), ता.खटाव येथील गट नं.८ व १८ ची १९/१२/८८ ने झालेल्या मोजणीचा नकाशा व हद्दी दाखवून मिळणेबाबत. (मोजणी र.नं.१३२१) | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यात एकमत झाले. तालूका निरीक्षक, भूमि अभिलेख, खटाव (वडूज) यांनी प्रत्यक्ष मोजणी करुन नकाशा व हद्दीबाबत अधीक्षक भूमी अभिलेख, सातारा यांना अहवाल सादर करावा, असे ठरले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१-११-२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६७ / पुणे /२००७ | ५३२ / पुणे /२००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.सुधाकर शंकर गुंजाळ अंजनी, अनुपम पार्क, बावधन खुर्द, पुणे-४११०२१ | श्री.अभिमन्यू पोपट गव्हाणे मु.पो.डिंग्रजवाडी, ता.शिरुर, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | चिटणीस,जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे | जिल्हाधिकारी, पुणे | हजर |

| | | |
|---|---|---|
| ५ | **अपील क्रमांक ३६७**<br>मूळ अर्जात मागितलेली माहिती<br><br>जिल्हाधिकारी, पुणे यांनी बावधन खु. येथील स.नं.१३/२ सागर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित क्षेत्र ३ हे.२७आर या क्षेत्रास वा जमिनीस आदेश क्र.पीआरअे-एनए/एसआर/७४/५१/३, दि.१४.९. १९९१ नुसार अकृषिक परवानगी फक्त निवासी कारणासाठी दिलेली आहे. मंजूर लेआऊटमधील भूखंड क्र.१ ते ५(एनडीआर लगत)मधील चारही इमारतीचा वापर वाणिज्य कारणासाठी केला जात आहे. या संदर्भात मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी पाठविलेल्या २९.१२.२००५ च्या पत्रानुसार कार्यालयाने काय कार्यवाही केली याबाबत,<br>१.निष्कर्ष काय आहेत,<br>२.इमारतीचा वापर वाणिज्य कारणासाठी होत असेल तर नियमानुसार काय कार्यवाही केली जाणार आहे. | माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता गैरहजर.<br>मागितलेली माहिती निष्कर्षावर आधारित अपेक्षित कार्यवाहीची असल्याने प्रशासकीय कारवाईत येते. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६ | **अपील क्रमांक ५३२**<br>**मूळ अर्जात मागितलेली माहिती**<br><br>जिल्हाधिकारी, पुणे (गृह शाखा) यांच्याकडील दि.३०.१.२००६ रोजीच्या पत्रान्वये काय कार्यवाही करण्यात आली. कार्यवाही प्रलंबित असल्यास कारणे मिळावीत व न कळविण्याची कारणे इ. माहिती मिळणेबाबत. | दि.३०.१.२००६ रोजीच्या पत्राप्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता गैरहजर. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र कार्यवाहीबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. |

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) संबंधित विषयाबाबत केलेल्या व प्रस्तावित कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे यांनी आठ दिवसात नि:शुल्क द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.११.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १५-०५-२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. बाबुराव भगवंतराव गायकवाड मु.पो.लोहोम, ता.खंडाळा, जि.सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३७ / सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत लोहोम, लोहोम, ता.खंडाळा, जि.सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती खंडाळा, खंडाळा, जि.सातारा | ग्राम पंचायत ठराव क्र.३, दिनांक २५-०१-२००६ ची नक्कल व ठरावासाठीच्या अर्जाची प्रत. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९-११-२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे घविशेष अपील निर्गत कार्यक्रमङ दि. २२-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्र. | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपीलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३७८ | श्री. बाबासाहेब शंकर सोलनगर, मु.पो.सलगरे, ता.मिरज, जिल्हा सांगली | वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, सांगली. (शिक्षण खाते) | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली, जिल्हा सांगली | सन २००२ ते माहे एप्रिल २००७ पर्यंत शिक्षक/मुख्याध्यापक यांच्या संच मान्यतेबाबत व पगार भविष्य निर्वाह निधी अग्रिम याबाबत एकूण १० मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. ३१/११/२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |
| २ | ४३६, ४३७/ सांगली | श्री.वसंत सत्तू भोसले, स्फुर्ती चौक, मु.पो. इनाम धामणी, शेवा निवास, ता.मिरज, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इनाम धामणी ता.मिरज, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी, पंचायत समिती , मिरज, जिल्हा सांगली | दि.१/१/२००५ ते दि. १६/८/२००६ या कालावधीत घेण्यात आलेल्या ग्रामसभेच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ३ | ४३८/ सांगली | श्री.वसंत सत्तू भोसले, स्फुर्ती चौक, मु.पो. इनाम धामणी, शेवा निवास, ता.मिरज, जिल्हा सांगली | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, इनाम धामणी ता.मिरज, जिल्हा सांगली | गट विकास अधिकारी, पंचायत समिती , मिरज, जिल्हा सांगली | दि.१/१/२००० ते दि.२१/८/२००६ या कालावधीतील दारिद्र्य रेषेखालील यादी व ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत एकूण ३ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४३९/ सांगली | श्री.भागुदास बापू साळुंखे मु.फार्णेवाडी, (शिगाव),पो.ढवळी, ता.वाळवा, जिल्हा सांगली | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद, सांगली | मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , सांगली, | अप्पर आयुक्त ,पुणे यांच्याकडील ४२/२००५ दि. ३१/८/२००५ आदेशाची प्रत | आवश्यक माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ५ | ४४१/ सांगली | श्री.संजय विजय भिडे १११९/१, उत्तर शिवाजीनगर, कै विष्णू विनायक भीडे मार्ग, गणपती गॅस गोडावू जवळ, सांगली ४१६ ४१६ | स्वीय सहायक, विक्रीकर सहआयुक्त (प्रशा), विक्रीकर भवन, एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे | विक्रीकर सहआयुक्त (प्रशा), विक्रीकर भवन, एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे | आर्थिक वर्ष १९९६-१९९७ ते सन २००५ - २००६ या कालावधीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात 'व्यवसाय करापासून मिळणाऱ्या प्रत्यक्ष उत्पन्नाबाबत. | आवश्यक माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ६ | ४४२/ सांगली | श्री.संजय विजय भिडे १११९/१, उत्तर शिवाजीनगर, कै विष्णू विनायक भीडे मार्ग, गणपती गॅस गोडावू जवळ, सांगली ४१६ ४१६ | स्वीय सहायक, विक्रीकर सहआयुक्त (प्रशा), विक्रीकर भवन, एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे | विक्रीकर सहआयुक्त (प्रशा), विक्रीकर भवन, एअरपोर्ट रोड, येरवडा, पुणे | आर्थिक वर्ष १९९६-१९९७ ते सन २००५ - २००६ या कालावधीत सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करापासून मिळणाऱ्या प्रत्यक्ष उत्पन्नाबाबत | आवश्यक माहितीने समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ७ | ४६२/ सांगली | श्री.शिवाजी महादेव जावीर, मु.पो.नेलकरंजी, ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तालुका कार्यकारी अधिकारी व दंडाधिकारी, आटपाडी, जिल्हा सांगली | जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (महसूल विभाग) जिल्हा सांगली | मौजे नेलकरंजी सि.स.नं.३६१ मधील बेघरांना देण्यात येणाऱ्या घरजागांबाबत माहिती | अपीलकर्त्याचे प्राप्त माहितीने समाधान झाले आहे. मात्र अपीलकर्त्याची मागणी असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नही. |
| ८ | ४३०/ सांगली | श्री.शिवाजी महादेव जावीर, मु.पो.नेलकरंजी, ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तालुका कार्यकारी अधिकारी व दंडाधिकारी, आटपाडी, जिल्हा सांगली | जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (महसूल विभाग) जिल्हा सांगली | मौजे नेलकरंजी सि.स.नं.३६१ मधील बेघर दलितांना प्रत्येकी १ गुंठा जागा मोजणी करुन देण्याबात. | अपीलकर्त्याचे प्राप्त माहितीने समाधान झाले आहे. मात्र अपीलकर्त्याची मागणी असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४२८/ सांगली | श्री.रामचंद्र शिवाजी पवार द्वारा संजय आण्णा पाटील ६६, आनंद भवन विरभद्र देवालया - जवळ, पाटील गल्ली, गावभाग, सांगली ४१६ ४१६ | उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा सांगली | उप जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा, सांगली मिरज नागरी समूह, राजवाडा कंपौंड सांगली. | तळेगाव दाभाडे योजनेच्या धर्तीवर करण्यात आलेल्या योजनेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या आदेशाच्या सत्य प्रती व या समितीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत | प्राप्त माहितीने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने दि. २१/१०/०८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील सर्व अपिले (क्र .३७८,४३६,४३७,४३८,४३९,४४१.४४२,४६२,४३०,४२८) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १४-११-२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.